# स्वामीमय जीवन

आसनी भोजनी शयनी स्वप्नी जागृतीत स्मरते तुझेच दिव्य मधुर नाम
ध्यानीमनी कृतीत गुंजन जपहि करितो तुझाच माझा आत्माराम
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ईश्वरा
कालरात्रीच्या निद्रा डोही स्पंदन तव नामाचे सर्वेश्वरा
प्रात:समयी जागृती येता ओठावर सदैव भवतारक तव नाम
ध्यानात खोल बुडता कूटस्थावर प्रगट होतो मम स्वामीराम
पूर्व दिशेला सूर्य बिंब प्रगटता गायत्रीचे अर्ध्य तुला
नैवेद्य दुग्धपेयाचा प्रथम अर्पण सप्रेमे तुजला
शुभदायक तव नाम स्मरुनी सुटे पूर्ण रात्रीचा उपवास
तव नामाच्या गजरानंदे सुरु माझा नवदिन नित्य प्रवास
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..........
गतीचक्र निशिदिनी फिरता जीवनी हरघडी नवे नवे व्याप
रात्रंदिन लढतो आम्ही संसार युध्दे अति भयंकर मनी संताप
कर्कश कोलाहल रणवाद्द्यांचे , भीषण मानवी शब्दांचे
वार झेलतो सर्व दिशांनी नानाविध क्रूर शस्त्रांचे
परि अंतरीच्या गूढगर्भी निनाद उठता तव नाम तरंगांचे
प्रक्षुब्ध मन शांत माझे मायाजाल संसाराचे सहज विरुन जाते
ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ,तेथे तुझे नाम सदैव स्मरते
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ.........
जीवन संध्या समय येता, मृत्युछाया भिवविती हृदया
आप्त जनांचे वियोग देती दारुण चटके मनास सदया
चिंता व्याधी द:ुखच देती यातनेवरी अधिक यातना
परि तव नामाच्या मधुर स्वरावर नष्ट सर्व तीव्र वेदना
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ.............
सूर्यास्ताला संध्यासमयी मन माझे विणते
आठवणींच्या धाग्यासंगे वस्त्र मधुर स्वप्नांचे
जादुमय त्या वस्त्रावर उठवते मन शिक्के तव नामाचे
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्‌थ,,,,,,
दिन सरता रात्र येते हलकेच शांत पाउलांनी

थकलेला देह मम निद्राधीन संथ श्वासलयी
त्या   स्पंदनावर हृदयी उठती तव नाम लहरी
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ------

**हेमा जोशी**